पॉप्युलर प्रकाशन

प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

अंकविशेष



कुणाल आणि त्याची कविता
इंद्रजीत भालेराव

बहुरूपी
चिंतामण गणेश कोल्हटकर

चिंचेचं झाड
कटू-गोड आठवणींची भुरळ

दास्तान-ए-तुर्की
सत्तर तासांपूर्वी

कुणाल आणि त्याची कविता

अफाट जगायच्या नादात

अफाट जगायच्या नादात हा कुणाल गायकवाड यांचा पहिला कवितासंग्रह पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रकाशित होत आहे. या कवितासंग्रहाची प्रकाशनपूर्व नोंदणी सुरू असून त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. कवी इंद्रजित भालेराव हे ज्या महाविद्यालयात शिक्षक होते त्या महाविद्यालयात कुणाल गायकवाड हे विद्यार्थी होते. 'कुणाल माझा विद्यार्थी नसला तरी विद्यार्थ्यापेक्षा जास्त जवळचा होता,' असं भालेराव यांनी म्हटलं आहे. त्यांच्या सान्निध्यात कुणाल गायकवाड यांच्या कवितेला आकार आला, मोकळ्या चर्चेतून कवितेला वळण आले. गायकवाड यांनी या कवितांची जुळवाजुळव करून हे बाड भालेराव यांच्याकडे वाचण्यासाठी दिलं. विद्यार्थ्यापेक्षा जास्त जवळच्या असणाऱ्या त्या मुलाच्या कविता वाचून इंद्रजित भालेराव यांनी कुणाल गायकवाड यांना एक पत्र पाठवलं. ते हे पत्र :

प्रिय,

कुणाल गायकवाड

स. न.

दिवाळीत मी हैदराबादला असताना तू घरी येऊन गेलास. तुझ्या कविता ठेवून गेलास. आपली भेट झाली नाही. परत आल्यावर मी वेगवेगळ्या कामात गुंतलो आणि तुझ्या कविता वाचायला उशीर झाला. आता तुझ्या कविता वाचून झालेल्या आहेत आणि मला तुझी तू इथे असतानाची विविध रूपं आठवत आहेत. आमच्या महाविद्यालयात तीन वर्षे तू शिकायला होतास. माझा विद्यार्थी नव्हतास पण विद्यार्थ्यांपेक्षाही जवळचा होतास. तुझा विषय विज्ञान, माझा विषय मराठी. पण तू वाचन छान करायचास. चर्चाही छान करायचास. तेव्हाची तुझी काही रूपं माझ्या डोळ्यासमोर आहेत.

आपल्या अपंग मित्राचा केवळ पायच नव्हे; तर त्याचं काळीज होऊन स्पंदनारा तू, माझ्याही मुलांना श्रमसंस्कार छावणीतून संस्कारित करणारा तू, विद्यार्थी अवस्थेतही जमेल तसं माझं एकेक पुस्तक खरेदी करून सहीसाठी अधून मधून माझ्याकडे येणारा तू, संस्थेने मला अडचणीत अधांतरी उभं केलेलं असताना कुठून तरी शोधून माझ्या बुडाखाली खुर्ची आणून ठेवणारा तू, विद्यार्थी असताना अत्यंत रुजू भावनेनं खाली मान घालून उभा राहणारा तू, तुझ्या पोटात इतका विद्रोह दडलेला असेल अशी कल्पनाही तेव्हा कुणी केली नसती.

तू पुण्याला गेलास आणि पुढेपुढेच जात राहिलास. पाठीमागून माझा लहान मुलगा चंद्रगुप्तही तिथं आला. तो तुझ्याविषयी सांगत होता आणि तू त्याच्याविषयी सांगत होतास. तू कविता लिहू लागलास आणि मंगेश काळे यांनी संपादित केलेल्या ‘खेळ’च्या एका अंकात तुझ्या

कविता छापून आल्या. त्याऽ वाचून मी हरकून गेलो. भौतिक शास्त्राचा विद्यार्थी असूनही कवितेतच रमतो अशी तक्रार करणाऱ्या तुझ्या जाधव सरांना 'खेळ'मधल्या कविता दाखवल्या तेव्हा बापाचा डोळा चुकवून पराक्रम गाजवणाऱ्या लेकरासारखं कौतुकच वाटलं त्यांना तुझं.

तुझ्या कविता म्हणजे समकाळाचं संवेदन आहे. आमच्या पुढच्या पिढीची पुढची पावलं आहेत ती. एखाद्या पापभिरू पित्याचा टारगट टॅलेंटेड मुलगा असं तुझं माझं नातं आहे. पोराचे असले पराक्रम पाहून बापाला लाजही वाटावी आणि कौतुकही तशी माझी अवस्था आहे. तुझ्या कवितेची प्रकृती तुझा समकालीन समीक्षकच नेमकेपणानं पकडू शकेल. मला ते नेमक्या शब्दात तुला सांगता येईल की नाही माहित नाही. रणधीर शिंदेसारख्या सजग समीक्षकाला म्हणूनच वाटलं की तू ज्या फेसबुक नोंदी लिहितोस त्याच शैलीत

कादंबरी लिहिलीस तर ते कोसलाच्या पुढचं पाऊल ठरेल. रणधीर असं जेव्हा माझ्याजवळ म्हणाला तेव्हा माझीच छाती फुगली आणि उंची वाढल्यासारखं वाटलं.

तुझ्या माझ्या संवेदनातल्या फरकाचं उदाहरणच द्यायचं झालं तर माझी ‘लम्हानीन’ ही कविता आणि तुझी ‘कैक भटक्या शतकांचा घाम जिरून’ ही कविता आमने-सामने ठेवल्या की काही बोलायचीच गरज उरत नाही. जमीन अस्मानाचा फरक आहे आशय आणि अभिव्यक्तीत आपल्या दोघांच्या. तू जास्त सरळ, जास्त थेट, उघडानागडा (महावीरांवरची तुझी कविता यासंदर्भात पहावी) आणि मी लाजराबुजरा, प्रतिमाप्रतीकांच्या अडून बोलणारा. पिढ्या बदलतात, मानसिकता बदलते, संवेदन बदलतं, कविता बदलते हेच खरं. मी तुझ्यासारखं लिहू शकलो नसलो तरी तुला समजून मात्र नक्की घेऊ शकतो. मीही उघड्या रानातल्या

संभोगाचं थेट प्रक्षेपण माझ्या कवितेत केलेलं आहेच. पण लाजतबुजत, संकोचत. तुम्हाला या गोष्टींची आता गरज वाटत नाही.

मधल्या एका पिढीला पुन्हा एकदा विठ्ठलाची प्रस्थापना करावीशी वाटली होती. ते काम त्यांनी प्रामाणिकपणे केलं. तुम्हाला त्या प्रतिमेची पुन्हा मोडतोड करावीशी वाटते आहे. त्या परंपरेला चिकटून येणारी नकळत विषमता खरवडून काढावीशी वाटते आहे. तुम्हाला विठोबा पेक्षा बिरोबा आणि खंडोबा जास्त महत्त्वाचा वाटतो आहे. तसा तो आधीच्या पिढीलाही वाटलाच होता. अरुण कोलटकरांनी इंग्रजीत लिहिलेली 'जेजुरी' हे त्याचं ठळक उदाहरण. पण आधीच्या पिढीने विठोबा आणि बिरोबा यात फारसा फरक केलेला नव्हता. तुम्ही तो करताय त्याचीही तुमची म्हणून काही कारणं असतीलच.

आधीच्या पिढीच्या कवितेत लम्हानी, घिसाडी प्रतिनिधिक रूपात येऊ लागलेले होते. तुम्हालाही लम्हानी, घिसाडी साद घालत आहेत. पण तुम्ही थेट आरपारचं पाहता. आम्ही तितकं थेट, तितकी चिरफाड करून पाहू शकत नव्हतो. तुमची झालेली कोंडी तुम्ही तुमच्या पद्धतीने फोडत आहात. त्यात विठोबाची आणि ही सगळी मोडतोड अपेक्षितच आहे.

मराठी कवितेत आधी खूप वेळा आलेली गढी तू नव्या परिमाणांनी पुन्हा पुन्हा तुझ्याही कवितेत आणलीस. त्यामुळे प्रतिमा जुनी असूनही तुझ्या कवितेत ती ताजी होत गेली. शब्दांच्या बाहेरख्यालीपणाला कविता न समजण्याची उपजत समज तुझ्याकडे आहेच. त्यामुळे तुझ्या शब्दकळेला आम्ही बावरलो तरी त्यात वावगं काही नाही, हेही जाणतो. वासनेला कवितारूप देण्याचा प्रकार एकदा सतीश काळसेकर यांनी केलेला होताच. त्यातली काही

नवी परिमाणं तू शोधतो आहेस हे वाचूनही तुझं कौतुक वाटलं.

तू मुळातला गावाकडचा. त्यामुळे वेगवेगळ्या प्रतिमांतून हा गाव तुझ्या कवितेत डोकवत राहतो. काही माहीत असलेल्या ग्रामतपशिलांना तू दिलेलं प्रतिमारूप अचंबित करणारं आहे. ही नव्या ग्रामीण कवितेची नवी वाट तर नाही ना ? असंही मला वाटून गेलं. त्यामुळे ग्रामीण कविता कात टाकेल आणि नव्या तेजाने सळसळेल असंही वाटलं. समतेच्या निळ्या आभाळाचं आकर्षण आतल्यांचं आणि बाहेरच्यांचं निरनिराळं असतं. एक विषमता संपवता संपवता दुसरी उगवते. यालाच जाणत्यांनी 'जातीच्या हरळीचे मूळ' म्हटलेलं आहे. एकाने जात ओलांडून चालत नाही. ती दोघांनाही ओलांडावी लागते. नाही तर बावळट खुळेपण अंगावर येतं, याचीही सतत जाणीव ठेवावी लागते. त्यासाठी तथागताच्या

शेजारी बिरोबाचं निरंजन जळत राहावं लागतं, हे तुलाही ठाऊकच आहे.

चुकून गवताचा वास आला तर आपण नादानीत गवताच्या झपकाऱ्यानं किती फुलपाखरे मारली याची आठवण करणारा तू संवेदनशीलतेची किती कोवळीक बाळगून आहेस हे मी सांगायला नको. त्यामुळे तुझ्या कविता वाचताना जागोजाग असे थांबे सापडतात आणि जीव उचंबळून येतो. थोडा वेळ डोळे मिटून पडावं असं वाटतं. काहीतरी थोर वाचल्याचं समाधान देण्याची क्षमता तुझ्या शब्दात नक्कीच आहे.

तुझ्या कवितेत बिरोबा आणि गोदावरी नदी अधून मधून येत राहतात. त्यातल्या त्यात गोदावरी आणि 'गाथा सत्तसई'चे संदर्भ मला फार महत्त्वाचे वाटले. त्यातून तू स्त्रीत्व समजून घेतलंस, असंही माझ्या लक्षात आलं. भूत, भविष्य आणि वर्तमानाची सखोल जाण

त्यातून तू प्रकट केलीस. त्यामुळे तुझ्या कविता संदर्भसंपन्न झालेल्या आहेत. आपली पाळमुळं भाष्यांसह नोंदवणं हे मराठीत खूप कमी कवींमध्ये येतं. तुझ्या कवितेत ते पाहून खूप समाधान वाटलं.

अलीकडच्या तुझ्या काही कविता फेसबुक वर वाचल्या होत्या. इथं तुझ्या कविता एकत्रित वाचतांना तुझी प्रकृती आणि आवाका लक्षात आला. तो मला समाधानकारक वाटला. तुला खूप खूप शुभेच्छा आणि तुझं खूप खूप हार्दिक अभिनंदन ! चांगली कविता लिहिणं ही मला नेहमीच अभिनंदनीय गोष्ट वाटत आलेली आहे.

तुझा
इंद्रजीत भालेराव

अफाट जगायच्या नादात

कुणाल गायकवाड

ही कविता पिवळा भंडारा उधळत सुंबरान मांडते, गजीचा ताल धरते, संबळाचा निनाद करते. बिरोबा, खंडोबा यांच्याशी नातं सांगून आपण खुद्द संस्कृती आहोत असा जबर आत्मविश्वास बाळगते. वतन सिद्ध करणाऱ्या इथल्या 'स्थावर' आणि 'जंगम' गोष्टींना फाट्यावर मारते. म्हणूनच खऱ्या अर्थाने विमुक्त, बेबंद असलेल्या या कवितेला निळाईचे अफाट आकर्षण आहे.

– आसाराम लोमटे

पाने : १०८	बांधणी : हार्डबाऊंड	किंमत : ३००/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तके खरेदी करता येतील.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट popularprakashan.com

Available on amazon.in

Follow us on: @popularprakashan

अधिक माहितीसाठी संपर्क 9867242407

बहुरूपी

चिंतामण गणेश कोल्हटकर

रंगपटाची सर्व सिद्धता झाली आहे! अर्धनारीनटेश्वराच्या छायाचित्रापुढे लावलेल्या उद्बत्त्यांचा व धूपाचा घमघमाट सुटला आहे! सर्व प्रकारच्या रंगाच्या साधनसामग्रीबरोबरच व्यक्ती व वय निदर्शक दाढीमिशांकरिता केसांची सामग्री तयार आहे. धर्मवेडा औरंगजेब ज्या केसांनी दाढीमिशा लावणार आहे, त्याच केसांतून श्रीछत्रपती शिवाजी महाराजही मिशांना पीळ देत धर्मरक्षणाच्या प्रतिज्ञा करणार आहेत. श्रीरामकृष्णांप्रमाणेच रावणाची आणि कंसाची रंगरंगोटीही येथील एकत्र रंगानेच होणार आहे!

नटवर्य चिंतामण गणेश कोल्हटकर यांच्या नाट्यक्षेत्रील ख्यातकिर्तीशी साठ-सत्तर सालाअगोदरचा मराठी प्रेक्षक सुपरिचित आहे. बहुरूपी या आपल्या आत्मचरित्रपर, स्मृतिरंजनपर पुस्तकात कोल्हटकरांनी आपल्या नाट्यजीवनाविषयी आणि प्रामुख्याने त्यांच्या दिग्दर्शक-अभिनेता म्हणून घडलेल्या नाट्य-कारकिर्दीतील महत्त्वाच्या नाटककारांविषयी लिहिलं आहे. या पुस्तकाचे लेखक म्हणून आपली भूमिका ते मांडतात —

माझ्या आयुष्यात विविध नाटकांतून ज्या परस्परविरोधी भूमिका मी केल्या, त्यांच्या सजावटीपूर्वीचे रंगपटातील प्रवेशप्रसंगीचे माझे हे निवेदन आहे. रंगपटापर्यंत माझा प्रवेश कसा झाला, या माझे नाटककार म्हणणाऱ्या 'मी'ची पूर्वपीठिका काय, प्रत्यक्ष सहवासात 'माझे नाटककार' मला कसे दिसले; कुणी वडिलांची वत्सलता दाखविली, तर काहींनी गुरुतुल्य मार्गदर्शन केले, काहींचा प्रेमळ बंधुभाव प्रत्ययाला आला, तर काहींनी

जिव्हाळ्याच्या मित्राचा स्नेहभाव दाखविला; त्याचप्रमाणे या नाटकाचे निमित्ताने काही विशिष्ट श्रेष्ठ व्यक्ती भेटल्या; काही प्रेक्षणीय स्थळे पाहिली, तर काही चालीरीतींचे मला कसे आकर्षण वाटले; माझ्या व्यवसायाच्या महत्त्वाच्या अंगांचे, प्रगतीचे समालोचन मी कसे केले ते मी निरनिराळ्या निमित्ताने सांगणार आहे.

यातील ‘स्वगत’ या पहिल्या विभागात कोल्हटकरांनी त्यांच्या नाट्यपदार्पणापर्यंतचा प्रवास अतिशय रंजक आणि आटोपशीररित्या सांगितलेला आहे. त्यानंतर नाटक मंडळीत प्रवेश करून, ‘बलवंत संगीत मंडळी’ या आपल्या काही सहअभिनेते, मित्रपरिवारासह सुरू केलेल्या नवीन नाटक मंडळीतर्फे अनेक नाटके दिग्दर्शित आणि मंचित करून कोल्हटकर आणि त्यांच्या या ‘बलवंत संगीत मंडळी’ने ही नाटके अजरामर केली. त्यांच्या नाटककारांचा समावेश ‘स्वगत’नंतरच्या ‘माझे नाटककार’ या विभागात कोल्हटकरांनी केला आहे.

त्यात एकूण चोवीस नाटककार आहेत. यामध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर, कृष्णाजी खाडिलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, स्वा. विनायक दामोदर सावरकर, राम गणेश गडकरी अशा श्रेष्ठ नाटककार-व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे.

'बलवंत संगीत मंडळी' ही नाटककंपनी बंद झाल्यानंतर / केल्यानंतर कोल्हटकरांनी अन्यत्र बसवलेली नाटके आणि त्यांच्या नाटककारांचा समावेश 'उत्तरार्ध'मध्ये त्यांनी एकत्रितरित्या केला आहे. त्यामध्ये ना. सी. फडके, गदिमा, पु. ल. देशपांडे, मामा वरेरकर अशी साहित्य-नाट्यक्षेत्रातील अग्रण्य नावे आहेत.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार स्वीकारताना

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील तसेच उत्तरार्धातीलही काही श्रेष्ठ नाटककारांविषयी कोल्हटकरांनी यात लिहिलेलं आहे. या नाटककारांचे नाटकांविषयीचे दृष्टिकोण, तेव्हाचे नाट्यविषय, नाट्यप्रसंगांची मांडणी, रंगमंचावरील देखाव्याची कल्पना, पात्रांची वेशभूषा, या सर्वांवरील खर्च, तालमीच्या वेळी घडलेल्या आणि नाटकाविषयीच्या इतरही काही रोचक घडामोडी (आजच्या भाषेत BTS), तेव्हाचा प्रेक्षकवर्ग, त्याची मानसिकता, त्याच्या नाटकांविषयीच्या प्रतिक्रिया, त्याचा नाट्यव्यवसायाकडे, रंगभूमीकडे पाहण्याचा दृष्टिकोण, तो बराचसा संकुचित जरी असला तरी मराठी रंगभूमीचा, संगीतनाटकांचा तोच

सुवर्णकाळही होता हे त्या काळाचं एक विशेष — या सर्वांचा आढावा कोल्हटकरांनी घेतला आहे. अशा रीतीने ‘बहुरूपी’ हे सर्वार्थाने वाचनीय आहे. ज्यांना अभिनयसृष्टीत, नाट्यसृष्टीत, नाट्यव्यवसायात रस आहे अशा होतकरू आणि प्रस्थापितांनी तर हे पुस्तक आवर्जूनच वाचावं असं आहे.

या पुस्तकाचे काही विशेष आणि ठळक पैलू —

स्त्री नाटककारांविषयी, नाटकात स्त्रियांनी कामे करण्याविषयी कोल्हटकरांनी आपलं मत यात एकेठिकाणी मांडलेलं आहे.

मा. दिनानाथ मंगेशकर या ‘बलवंत संगीत मंडळी’तील कोल्हटकरांच्या खांद्याला खांदा लावून कसून मेहनतीने काम केलेल्या नटवर्याविषयीचे रोचक, गमतीशीर किस्से तर यात वर्णिले आहेतच; परंतु त्यांच्या ठायी असलेल्या गुणांबाबत, कौशल्यांबाबत कोल्हटकरांनी साभिमानाने गौरवोद्गार अक्षरांकीत केले आहेत. ही स्तुतिसुमने उधळताना त्यांनी अजिबात आपला हात आखडता घेतला नाही. किंबहुना

ठिकाठिकाणी ही मुक्तहस्ते उधळण तर आहेच; परंतु आपल्या नाटककारांप्रमाणेच मा. दिनानाथांवरही एक स्वतंत्र, आदरसंपृक्त लेख लिहून कोल्हटकरांनी त्यांच्याप्रति आपला कृतज्ञभाव व्यक्त केला आहे. समकालीन नाटककारांविषयी, दिग्दर्शकांविषयी, सहअभिनेत्यांविषयी आणि मुख्य म्हणजे त्यांच्या कार्याविषयीचा आदर यात ठिकठिकाणी आढळून येतो. नाटककार राम गणेश गडकरी यांच्या 'पुण्यप्रभाव' या नाटकाच्या हस्तलिखिताविषयीचा किस्सा ते सांगतात —

'पुण्यप्रभाव'च्या तालमींना जोराने सुरुवात झाली. त्याबरोबरच नाटकाचे हस्तलिखित कापून कमी करणे, उरलेली पदे करणे, त्याकरिता नव्या चाली निवडणे, वगैरे कामे व्हावयाचीच होती. तेही एक-एक काम हाती घेण्यात आले. ...

हस्तलिखित कापून बेताचे करणे ही मात्र अत्यंत अवघड कामगिरी होती. पण त्याची सर्वस्वी जबाबदारी गडकरीमास्तरांनी आपले परमस्नेही

विठ्ठल सीताराम ऊर्फ अण्णा गुर्जर यांच्यावर सोपविली होती. हस्तलिखित आणि तेही अशा नाटककाराचे कापून प्रयोगापुरते ठेवणे, त्यातील एकही धागा, संदर्भ, महत्त्वाच्या कल्पना यांना धक्का पोहोचू न देता रंगावृत्ती तयार करणे म्हणजे अक्षरशः तारेवरचा नाच. त्यांच्या मदतीला माझी योजना करण्यात आली होती.

अण्णांच्यासह आमची हस्तलिखिताची कापाकापी सुरू झाली, म्हणजे मास्तर म्हणत, "ती पाहा, कसाबकरणी सुरू आहे!" चार वाक्यांवर तांबड्या पेन्सिलीचा काट मारला, म्हणजे, "मारली, मारली माझी चार पोरे!" म्हणून मनापासून ते तळमळत. पण त्यांनी हस्तक्षेप कधीच केला नाही. गुर्जर हे चिकित्सक टीकाकार आहेत. त्यामुळे सर्व धागेदोरे लक्षात घेऊन साकल्याने त्याचा विचार करणे हे त्यांच्याकडून स्वाभाविकपणे होई. शिवाय श्रीपाद कृष्णांना गुर्जरही गुरूच्या ठिकाणीच मानीत. श्रीपाद कृष्णांच्या हस्तलिखितांच्या रंगावृत्त्या तयार

करण्यात त्यांचा बराच हात होता. तेव्हा नाटकाच्या हस्तलिखिताच्या कापणीवर त्यांचा हात चांगलाच सरावला होता.

कोल्हटकरांनी गडकरींपासून ते पु. ल. देशपांडेंपर्यंत म्हणजे अक्षरशः दोन पिढ्यांसोबत काम केले. या दोन वेगवेगळ्या पिढीतील नाटकांचे विषय ते त्या नाटकांची भाषा, संहिता कोल्हटकारांनी आपलीशी केली. म्हणूनच असेल कदाचित, परंतु या पुस्तकात साधी-सोपी-सरळ-सहज वाक्यांची भाषाही वाचायला मिळते आणि पल्लेदार वाक्यांच्या अनवट भाषेचाही आस्वाद घेता येतो. त्यामुळे यातील लेखांची भाषा हा या पुस्तकाचा एक महत्त्वाचा विशेष ठरतो.

‘माझे नाटककार’ या विभागातील चोविसावे (शेवटचे) नाटककार राम गणेश गडकरी यांच्याविषयीच्या प्रदीर्घ लेखाच्या प्रारंभी कोल्हटकर लिहितात —

संदर्भसूत्रात एकेक स्मृतिपुष्पाची गुंफण चालू असता एकदम हा एवढा पुष्पहार कशासाठी? हा

हार एवढ्यासाठीच, की योगायोगाने आज तेवीस जानेवारी आहे. आज गडकऱ्यांचा अडतिसावा स्मृतिदिन आहे. देवी सरस्वतीच्या मंदिरातील पंडितांच्या महासभेत हा दिग्विजयी नाटककार उच्चासनावर अधिष्ठित झाला आहे. त्याच्या आगमन-प्रसंगी द्वाररक्षकांनी दिलेल्या स्वागताच्या ललकाऱ्या, स्थानापन्नतेनंतर भाटचारणादिकांनी बिरुदांसह गायिलेले स्तुतिपाठ अद्याप वातावरणात निनादत आहेत. चला, वाचक, माझ्या बरोबर या. आपण त्या प्रतिभासंपन्न, महाराष्ट्राच्या आवडत्या नाटककाराच्या स्मृतिसमाधीवर पुष्पहार समर्पण करून भरल्या अंत:करणाने त्याला अभिवादन करू! या थोर रचनाकाराच्या उदय, मध्य, अस्त अशा तीनही अवस्था अनुभविलेल्यांपैकी मीही एक आहे. हे भाग्याचे, की दुर्दैवाचे, ते आजही मला सांगता येत नाही.

या लेखातच पुढे कोल्हटकर गडकरी मास्तरांच्या नाटकांतील पात्रांची नावे, संवाद, नाट्यसंहिता यांवर

असलेला गुजराती भाषेचा प्रभाव स्पष्ट करताना लिहितात —

मराठेशाही गडकऱ्यापोटी त्यांचा जन्म झालेला, तरी मास्तरांचे जन्मस्थान गायकवाडी नवसारीत. गुजराती जन्मभूमीची कृतज्ञता पात्रांच्या नावाने तर त्यांनी व्यक्त केलीच आहे. पण प्रसंगी पात्रांच्या तोंडी ती बोलूनही दाखविली आहे. 'प्रेमसंन्यास'मधील विद्याधर सुशिलेला आपली ओळख पटवून देताना 'गुणिला' या नावाने संबोधतो. त्यावर ती म्हणते, "गुणिला हे नाव लग्नाच्या गडबडीत माझ्या पतींनी मला सांगितले, त्यांनी मोठ्या आवडीने माझे हे गुजराती नाव ठेविले." 'प्रेमसंन्यास'मधील वीणा, गोकुळ, गुणिला ही जशी उघडउघड गुजराती नावे होत, तसेच द्रुमनही. नवसारीस त्यांची दुरामन नावाची एक बाळमैत्रीण होती. ती गुजराती मैत्रीण शाळेत वेळेवर जाण्याकरिता मोठ्या सकाळी रोज त्यांची झोपमोड करी. त्या झोपमोडीचा सूड उगविण्याकरिताच की काय, 'प्रेमसंन्यासा'त एका

मार्ग चुकलेल्या तरुणीला त्यांनी द्रुमन नावाने लोकांपुढे उभी केली. ‘तोड ही माळ’मधील काही नावे गुर्जरप्रांतीयच आहेत. ‘भावबंधन’मधील घनश्याम, महेश्वराला गुजराती येत असल्याचे धनेश्वराला सांगताना “मला गुजराती चांगलेच येते. जवळजवळ माझी मातृभाषाच गुजराती आहे” असे अभिमानाने म्हणतो. महेश्वर आणि घनश्याम यांचा एक संवादही गुजराती आहे. या प्रांतीच्या वास्तव्यामुळेच गडकरीमास्तर बाळपणापासून आपल्या मातोश्रींना मा म्हणत; आणि मास्तरांचेही घरचे टोपणनाव लालजी होते, तेही जणू जन्मभूमीची साक्ष पटविणारे. मूळ नावासह टोपणनावाचे शब्द-स्मारक ‘एकच प्याल्या’त ‘रामलाल’च्या नावाने त्यांनी कायमचे उभे करून ठेविले आहे. त्यांच्या ‘बाळकराम’ व ‘तळिराम’ या नावांनाही हा काडीचा आधार पुरेसा आहे. ‘रामलाल’च्या तोंडी जन्मभूमीचा आदर त्यांनी उत्कटतेने व्यक्त केला आहे.

‘माझे नाटककार’मधल्या चोवीस नाटककारांच्या यादीत कोल्हटकरांनी दोन मुस्लिम उर्दू नाटककारांविषयीही लिहिलेलं आहे. उत्तर हिंदुस्थानात मराठी नाटकांच्या हिंदी-उर्दू भाषेतील सादरीकरणाकरिता त्यांच्या नाट्यरूपांतरणासाठी त्यांनी या दोन नाटककारांची मदत घेतली होती. या नाटककारांच्या कामाविषयीच्या कटु-गोड आठवणी यात आहेत. त्यानुसार त्यांच्याबाबतची बरी-वाईट मतंही कोल्हटकर नोंदवतात. या बाबीचा विशेष उल्लेख करण्याचं कारण, आज फोफावत असलेली जातीय-धार्मिक तेढ, त्यातलं निंदनीय आणि निराशाजनक राजकारण यांचे आपण अपरिहार्यपणे साक्षीदार बनत चाललो असल्याच्या पार्श्वभूमीवर या मुस्लिम नाटकारांविषयी, खासकरून त्यांच्याविषयी अगदी सहजभावाने बाळगलेला धार्मिक सलोखा कोल्हटकरांच्या शब्दांनी पुनरुज्जीवीत होतो. नाटककार अब्बास बेग यांच्याविषयी कोल्हटकर लिहितात —

नाटकाचे प्रयोग यशस्वीरीत्या सुरू झाल्यानंतर नाटकाचा देण्याघेण्याचा व्यवहार पूर्ण करण्याची वेळ आली. आमच्या मंडळीच्या व्यवस्थापकांसह व्यवहार पूर्ण करण्यास आम्ही व नाटककार बसलो. 'आप कहिये', 'आप कहिये', असे औपचारिक संवाद झाल्यावर मी कागद-पेन्सिल मुन्शीजींपुढे ठेवली आणि त्यांना सुचविले, की आपण दोघेही भिडस्तपणाने बोलणार नाही; तेव्हा तुमचा आकडा तुम्ही लिहून दाखवा, म्हणजे झाले. ही कल्पना त्यांनाही पटली. त्यांनी एकच आकडा काढला. माझी खात्री झाली, की स्वारीने हजारावर तर उडी मारली. त्यावर पाचाचा आकडा काढला. मग मात्र मी चरकलो. हजाराच्या आसपास देण्याची आम्ही आमच्या मनाची तयारी केली होती. पण या दीड... असे मी मनाशी म्हणतो आहे, तो त्यांनी एकच शून्य काढून तो कागद माझ्यापुढे टाकला. आता मी निराळ्या हबक्याने चरकलो. एक सबंध नाटकाचा हक्क दीडशे रुपयांना! छेः! महाराष्ट्रीय दरिद्री खरे,

पण दीडशे रुपयांना नवीन नाटकाचा हक्क विकत घेणे मनाला पटेना. तरी वरकरणी का होईना, या व्यवहाराची भाषा बोललीच पाहिजे, म्हणून मी वेडेवाकडे तोंड करीत म्हटले, "मुन्शीजी, आपही बताइये, ये ज्याआदा नहीं होते क्या?"

त्यावर तो मुन्शीजी अजीजीने म्हणाला, "एक ड्रापकू (एका अंकाला) पचास रुपये क्या ज्याआदा होते हैं?" नाटकाचे तीन अंक असल्यामुळे दीडशे रुपयांचा आकडा त्यांच्या मते योग्यच होता. त्याच्या म्हणण्याला अळेबळे संमती दिल्याचे दाखवून व्यवहार पुरा केला. यामुळे या उर्दू नाटक मंडळीतील मुन्शींचा बाजारभाव कळून चुकला, असे वाटल्यास म्हणू! पुढे याच मुन्शींजींच्या चिरंजीवांच्या एका धार्मिक विधीसाठी चारशे रुपयांची रक्कम एकदम आम्ही दिली. दीडशे रुपयांना एका नाटकाच्या प्रयोगाचा हक्क हे सर्वांनाच डाचत होते.

बहुरूपी

चिंतामण गणेश कोल्हटकर

पाने : ६१० | बांधणी : हार्डबाऊंड | किंमत : १२००/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तके खरेदी करता येतील.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on amazon.in

Follow us on: @popularprakashan

अधिक माहितीसाठी संपर्क
9867242407

पिंचेचं झाड

कटू-गोड आठवणींची भुरळ

सुंदर रामस्वामी (१९३१-२००५) हे तमिळ भाषेतील एक विख्यात लेखक होते. रूप आणि आशय यांमध्ये सातत्याने प्रयोग करण्याची सर्जनशील धडपड त्यांच्या कथा कादंबऱ्यांमधून दिसते. स्थानिक बोलीभाषांच्या बारकाव्यासह वैशिष्ट्यपूर्ण कथनशैली त्यांनी विकसित केली होती. त्यांच्या कथा आनंद देतातच, शिवाय वाचकाला खिळवूनही ठेवतात. तमिळ साहित्यविश्वातील एक महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण लेखक म्हणून रामस्वामींच्या कथा आधुनिकतेचा पारंपरिक जीवनपद्धतींमध्ये हळूहळू होत जाणारा प्रवेश उपरोधात्मक पद्धतीने मांडतात. रामस्वामी यांच्या कादंबऱ्या पेंग्विन प्रकाशनाने 'Modern Classics' मालिकेत प्रकाशित केल्या

सुंदर रामस्वामी

आहेत. रामस्वामी यांना २००४ मध्ये प्रतिष्ठेच्या 'कथा चूडामणी पुरस्कार' आणि २००१ मध्ये टोरोंटो विद्यापीठाच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

*तमिळनाडू राज्य शासनाच्या 'तमिळनाडू ट्रांसलेशन ग्रँट प्रोग्राम' अंतर्गत प्रकाशित झालेल्या, शर्मिला फडके यांनी भाषांतर केलेल्या सुंदर रामस्वामी यांच्या **चिंचेचं झाड** या कादंबरीचा परिचय.*

चिंचेचं झाड ही सुंदर रामस्वामी यांची तमिळमधून मराठीत भाषांतरित झालेली आधुनिक अभिजात कादंबरी आहे. एका प्रदेशाचा सामायिक इतिहास, हरपण्याचं दुःख, निसर्गाविषयीचं आपुलकीचं नातं आणि एखाद्या पौराणिक दंतकथेमध्ये शोभेल असं गावातल्या आयुष्याच्या केंद्रस्थानी असणारं एक चिंचेचं झाड, याविषयीचं मन भारावून टाकणारं चित्रण या कादंबरीत वाचायला मिळतं.

दक्षिण भारतातल्या एका छोट्याशा गावात चिंचेचं एक जुनं झाड उभं आहे. गावात घडणाऱ्या असंख्य गोष्टींचं ते जणू मूक साक्षीदारच. गावचा अवलिया दामोदर आसन या झाडाखाली बसतो आणि भोवती जमलेल्या मुलांना एकापाठोपाठ एक रंजक किस्से सांगत राहतो. त्या किश्श्यांमधून हळूहळू गावाचं जग वाचकांसमोर उलगडत जातं – तिथली माणसं, त्यांचे स्वभाव, त्यांचे पूर्वग्रह, त्यांचे व्यवहार आणि त्यांची जगाकडे पाहण्याची पद्धत...

पन्नास वर्षांहून अधिक काळ ते झाड भोवतालच्या जगाचा एक सहृदय साक्षीदार होतं. तिथला आनंद,

दु:ख, हसणं, रडणं प्रत्येक क्षण त्याने पाहिला. सावली देताना झाडाने कोणताही भेदभाव केला नाही. बैलगाडीच्या जमान्यापासून सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणीय बदलांनी गजबजून गेलेला गावाचा प्रवासही या झाडाने पाहिला. आणि त्याच गावामधला दामोदर आसन; एक गूढ तत्त्वज्ञ, असंख्य आठवणींचा संग्राहक, कथाकथनात निपुण असणारा. ते चिंचेचं झाड आणि त्या संदर्भात त्याने प्रसवलेल्या सगळ्याच कहाण्या, पिढ्यानपिढ्या लोकांना झपाटून टाकणाऱ्या रसाळ गोष्टींचा अखंड झरा त्याच्यापाशी होता.

कादंबरीचं कथानक एका अनामिक निवेदकाच्या प्रथमपुरुषी निवेदनातून सांगितलं आहे. निवेदक सुरुवातीला आसनाच्या आठवणी आणि त्याने सांगितलेल्या चिंचेच्या झाडाशी संबंधित गोष्टी आपल्यापर्यंत पोहोचवतो. पुढे मात्र कथनाचा आवाका वाढत जातो आणि त्या झाडाभोवती घडलेल्या निरनिराळ्या घटना आणि माणसांच्या कहाण्या समोर येऊ लागतात. या कादंबरीचं वैशिष्ट्य हे की,

ही पारंपरिक पद्धतीने सांगितलेली सलग कादंबरी नाही. परस्परांशी जोडलेल्या लघुकथांचा किंवा लघुकादंबऱ्यांचा संग्रह असं या कादंबरीचं स्वरूप आहे. पहिल्या काही प्रकरणांत दामोदर आसन आणि त्याच्या आठवणी केंद्रस्थानी आहेत मात्र साधारणपणे पाचव्या प्रकरणापासून पुस्तकाचा पोत बदलतो. नवी माणसं, नव्या व्यक्तिरेखा कथेत येतात, काही काळ त्यांची कहाणी पुढे सरकते आणि मग कथनाची सूत्रं पुढच्या व्यक्तिरेखेच्या हाती जातात. प्रत्येक व्यक्तिरेखेची स्वत:ची एक छोटी दुनिया आहे आणि चिंचेचं झाड या सगळ्या जगांना जोडणारा समान धागा बनून राहतं. म्हणूनच ही कादंबरी वाचताना नेहमीच्या पठडीतली कादंबरी वाचायला मिळेल ही अपेक्षा ठेवता येणार नाही. कथानकापेक्षा व्यक्तिरेखा, त्यांचे स्वभाव आणि त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या छोट्या-मोठ्या घटनांवर या कादंबरीत अधिक भर दिलेला दिसतो.

सुंदर रामस्वामी यांची ही पहिली कादंबरी. १९५८ ते १९६६ या काळात सुंदर रामस्वामी यांनी

या कादंबरीचं लेखन केलं. कादंबरीत तो काळ, तेव्हाची सामाजिक पार्श्वभूमी यांचं सहजसुंदर चित्रण रामस्वामी यांनी केलं आहे. दक्षिण भारतातील ग्रामीण भागातील लोकांचं जगणं, गावकऱ्यांची मानसिकता, सामाजिक -परंपरा आणि त्यांचे परस्परांचे संबंध — हे सगळं त्या काळाच्या चौकटीतून समोर येतं. आज ही कादंबरी वाचताना त्यातील काही गोष्टी निश्चितच जुनाट, किंबहुना ठळकपणे पुरुषप्रधान वाटतात. संपूर्ण कादंबरीत महत्त्वाच्या स्त्री व्यक्तिरेखा फारशा नाहीत. बहुतेक सगळे प्रसंग हे पुरुषांभोवती फिरतात असं वाटत राहतं. पण ही कादंबरी १९६०च्या दशकात लिहिली गेली आहे, हे विसरून चालणार नाही. त्या काळच्या ग्रामीण भारतीय समाजाचं वास्तवच बरंचसं असं होतं. परंतु रामस्वामी यांच्या लेखनाचं वैशिष्ट्य हे की या कादंबरीतील मानवी मनाचं चित्रण मात्र अजिबात जुनं वाटत नाही. साठ-सत्तर वर्षांपूर्वी लिहिलेल्या या कथांमध्ये स्वार्थासाठी केले जाणारे राजकीय डावपेच, सत्तेची गणितं, आर्थिक फायद्यासाठीची कारस्थानं

आणि माणसामाणसांमधली स्पर्धा आजच्या काळाशीही सुसंगत वाटणारी आहे. कुटुंबाशी, विरोधकांशी, धर्माशी, राजकारणाशी किंवा आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी माणूस कसा वागतो, याबद्दल लेखकाचे जे विचार कादंबरीत आले आहेत, ते आजही समर्पक वाटतात, कदाचित पूर्वीपेक्षाही अधिक. म्हणूनच तमिळ साहित्यातील आधुनिकतावादी कादंबऱ्यांतली ही एक महत्त्वाची साहित्यकृती म्हणून या कादंबरीचा उल्लेख केला जातो.

'चिंचेचं झाड' ही कादंबरी शैलीच्या दृष्टीने वेगळी असल्यामुळे या कादंबरीत रमायला वाचकाला जरा वेळ लागतो. कादंबरीत कथानक शोधत राहिलं तर ती थोडी संथ वाटेल पण कथानकापेक्षा व्यक्तिरेखांकडे लक्ष दिलं आणि त्यांच्या छोट्या छोट्या कहाण्यांमध्ये रमायला सुरुवात केली, तर कादंबरी अधिक खुलू लागते. पठडीतल्यापेक्षा थोडं वेगळं वाचायची आवड असलेल्यांना आणि हे पुस्तक ज्या सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवातून जन्माला आलं आहे, त्यांना आजचे निकष न लावता त्या काळाच्या संदर्भात

समजून घेण्याची तयारी असेल, तर या कादंबरीच्या वाचनातून एक समृद्ध अनुभव नक्कीच मिळतो. एकंदरीत, ‘चिंचेचं झाड’ हा पारंपरिक अर्थाने वाचायच्या कादंबरीचा अनुभव नाही.

दामोदर आसनच्या कथांनी भुरळ घातलेल्या एका अनामिक निवेदकाच्या कटू-गोड आठवणींमधून उलगडणारी ‘चिंचेचे झाड’ ही कादंबरी स्थित्यंतर, भौतिक विकासातील तडजोडी, अविनाशी प्रतिष्ठा, संस्कृती आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्या, तरीही स्मृतींमध्ये अखंड जिवंत राहिलेल्या एका प्रतीकाची वैश्विक कथा आहे.

मानवी स्वभाव, गावगाडा, सत्तेची गणितं आणि माणसांच्या स्वार्थी, असंवेदनशील जगाकडे वेगळ्या नजरेने पाहायचं असेल, तर ही कादंबरी एक वेगळाच आणि निश्चितच लक्षात राहणारा वाचनानुभव देते.

चिंचेचं झाड

सुंदर रामस्वामी

भाषांतर : शर्मिला फडके

दामोदर आसनच्या कथांनी भुरळ घातलेल्या एका अनामिक निवेदकाच्या कटू-गोड आठवणींमधून उलगडणारी 'चिंचेचे झाड' ही कादंबरी स्थित्यंतर, भौतिक विकासातील तडजोडी, अविनाशी प्रतिष्ठा, संस्कृती आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्या, तरीही स्मृतींमध्ये अखंड जिवंत राहिलेल्या एका प्रतीकाची वैश्विक कथा आहे.



पाने : २०६ | **बांधणी : पेपरबॅक** | **किंमत : ३५०/-**

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सअॅप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तके खरेदी करता येतील.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट popularprakashan.com

Available on amazon.in

Follow us on: @popularprakashan

अधिक माहितीसाठी संपर्क 9867242407

दास्तान-ए-तुर्की

‘पॉप्युलर प्रकाशन’ हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला - ‘दास्तान-ए-तुर्की’ - आपण ‘प्रिय रसिक’मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत.

आयफर टंक

सत्तर तासांपूर्वी...

अनुवाद : श्वेता प्रधान

आयफर टंक या तुर्की भाषेतील प्रस्थापित लेखिका व पत्रकार आहेत. विद्यार्थी दशेत असतानाच त्यांनी विविध नियतकालिकांसाठी लेखन केले होते. त्या पटकथासुद्धा लिहितात. साहित्यातील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असून त्यांच्या साहित्यात मानवी मनाचे गुंतागुंतीचे पैलू, तसेच तुर्की समाजातील सामाजिक आणि नैतिक बदल प्रभावीपणे प्रतिबिंबित होतात. मूळ तुर्की भाषेतील 'येसी पेरी गेसेसी' या कादंबरीचा हा मराठी अनुवाद.

या कादंबरीच्या नायिकेचे सौंदर्य हे तिचे वरदान आणि हेच सौंदर्य तिच्यासाठी शापसुद्धा ठरते. ‘सत्तर तासांपूर्वी’ तिच्या आयुष्यात घडलेल्या वेदनादायी, क्रूर प्रसंगानंतर स्वत:च्या भवितव्याची पर्वा न करता ती एक योजना आखून गुन्हेगारांना शासन करण्याचे ठरवते. यात मोठ्या व्यक्ती, सरकारी उच्चपदस्थ गुंतलेले असल्याने मोठा हलकल्लोळ माजणार होता. या निर्णायक दिवशी, ती तिच्या संपूर्ण भूतकाळाचे थर उलगडते आणि तिचे आजचे स्वरूप कसे तयार झाले हे दाखवते. कथानकाचे निवेदन तीच करते. तिचा भूतकाळ सलग क्रमाने न येता आठवणींनुसार येतो. परंतु सगळे धागे कथानकाच्या ओघात जुळले जातात. त्यामुळे वाचकाची उत्कंठा वाढत राहते.

एका अपघातात जायबंदी झालेले वडील, हॉस्पिटलमधे एकामागे एक ऑपरेशन होऊनसुद्धा, त्यांचा चेहरा पूर्ववत होत नाही. शिवाय एक हात गमवावा लागतो. एकदा शाळेतून आल्यावर ती आईला काकांसोबत नको त्या अवस्थेत बघते. हा तिच्या

आयुष्यातील पहिला आघात ठरतो. या घटनेनंतर कुटुंबाची आर्थिक आणि भावनिक घडी विस्कटते. तिच्या बालपणातील निरागसपणा हिरावला जातो. तिचे काका तिला दुसऱ्या शाळेत वसतिगृहात पाठवतात. तिथे एक शिक्षक तिचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतो; पण ऐनवेळी तिला अपमानित करून हुसकावून देतो. आणि हे प्रकरण दाबून टाकतो. आणि तिला लवकरच लक्षात येते की समाजात सौंदर्य, पैसा आणि सत्ता हेच अंतिम चलन आहे.

ती तिचे सौंदर्य भांडवल म्हणून वापरण्यास शिकते. तिला लोकांचे लक्ष वेधून घ्यायचे असते, तिला प्रभावशाली व्यक्ती बनायचे असते. या प्रयत्नात ती एकापाठोपाठ एक अशा चुकीच्या मार्गांची निवड करते. एका अश्लील मासिकासाठी नग्न फोटोशूट करते. हळूहळू समाजातील सर्वात क्रूर आणि स्वार्थी लोकांच्या जगात प्रवेश करते. तिच्या आयुष्यात अनेक प्रेमसंबंध येतात, पण ते तिला अधिक विफल करतात.

तिची आई नंतर तिला सोडून एका जर्मन माणसासोबत निघून जाते. नातेवाईकांमध्ये ती वेश्या म्हणून हिणवली जाते.

नंतर तिचे लग्न होते. नेभळट, भित्रा, आणि नंतर पैसे उडवून कर्जबाजारी झालेला तिचा पती मोठ्या भावाच्या सहानुभूतीवर जगत असतो. त्याचे सगळे कर्ज फेडण्यासाठी तो एक कामगिरी सांगतो, ज्यात तिचाही सहभाग अनिवार्य असतो.

संपूर्ण कथानकात कुठेही नायिकेचे नाव येत नाही. तिच्या अत्यंत क्लेशदायक, गुंतागुंतीच्या आणि आत्म-विध्वंसक जीवनाचा हा अस्वस्थ करणारा आलेख आहे. एका आधुनिक सामाजिक शोकांतिकेचे प्रतीक आहे. अपघाताने विकलांग झालेल्या वडिलांबद्दल प्रेम, सहानुभूती वाटत असताना त्यांची सुश्रुशा ती मनापासून करते. एखाद्या लहान बाळाप्रमाणे त्यांचे सगळे आवरते. पण आईचा तिरस्कार करते. ती हुशार, सुशिक्षित आणि संवेदनशील असूनही, आयुष्यात आलेल्या धक्क्यांमुळे आणि

नैतिक-अनैतिकच्या द्विधा मनःस्थितीत स्वतःच्या महत्त्वाकांक्षेचा बळी ठरते. सामाजिक दबावात ती चुकीचे निर्णय घेते. या सगळ्यासाठी तिचा अहंकार, एककल्ली हेकेखोरपणासुद्धा कारणीभूत आहे.

तुर्की समाजातील नैतिकतेचा ऱ्हास, श्रीमंतीचा पोकळपणा आणि सत्तेच्या खेळात ठराविक लोकांचे वर्चस्व, या वर्चस्वामुळे आलेला अहंकार आणि त्यामुळे सामान्य माणसाची कवडीमोल होणारी किंमत याचेही चित्रण आहे.

शेवटच्या क्षणी जगण्याची आशा सोडलेल्या या सौंदर्यवती तरुणीच्या आत्म-शोधाच्या प्रवासावरील एक उत्कृष्ट, परंतु हृदय पिळवटून टाकणारी ही कहाणी वाचकाला नक्कीच अस्वस्थ करते.

श्वेता प्रधान यांनी केलेला अनुवाद सुरस आणि प्रवाही आहे. मूळ तुर्की भाषेतील तीव्रता आणि लय जपण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मूळ भाषेतील कडवटपणा आणि करुणा हे अनुवाद वाचतानाही स्पष्टपणे जाणवतात.

सत्तर तासांपूर्वी...

आयफर टंक

अनुवाद : श्वेता प्रधान



पाने : ५३२ | बांधणी : पेपरबॅक | किंमत : ६५०/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७
या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील,
आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून
पुस्तके खरेदी करता येतील.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on amazon.in

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.